माहिती कक्ष


**एमआयडीसी पोलीस ठाणे,सोलापूर शहर**
दुरध्वनी क्रमांक. ०२१७-२७४४६९०
E-Mail-ps.midc.cpsol@mahapolice.gov.in


---

**प्रेसनोट** दि.०१/०४/२०२५

प्रति,

संपादक,

.................................. सोलापूर

विषय :- बातमी प्रसिद्ध होणेबाबत...

**' डायल ११२ वर खोटा कॉल करणाऱ्या इसमावर एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल '**

पोकॉ/१७६० सोमनाथ वाघमारे नेमणूक - एमआयडीसी पोलीस ठाणे सोलापूर शहर हे दि.२७/०३/२०२५ रोजी पी.सी.आर मोबाईल १ मध्ये कर्तव्यावर असताना त्यांना मध्यरात्री रोजी ०१:४८ वा.डायल ११२ वरून कॉल आला की,**"गणेश टेक्सटाईल्स, एमआयडीसी, सोलापूर येथे कॉलर घटनास्थळी असुन कॉलरच्या भावाने मर्डर केला आहे "** त्यावर ते गणेश टेक्सटाईल्स, एमआयडीसी, सोलापूर येथे गेले असता, तेथे इसम नामे विनायक विलास गायकवाड रा.१२९ निवारा नगर,सिद्ध हनुमान मंदिर जवळ,सोलापूर हा मिळून आला त्यावेळी त्याचेकडे चौकशी केलीस असता त्याने मीच डायल ११२ ला कॉल केला होता असे सांगितले. त्यानुसार त्याच्याकडे घटनेबाबत विचारणा केली असता तसेच त्याचे नातेवाईकांकडे चौकशी केली असता कोणतीही घटना घडली नसल्याचे सांगितले. यावरून खात्री झाली की, इसम नामे विनायक विलास गायकवाड याने डायल ११२ वर कॉल करून खोटी माहिती दिल्याने त्याचेविरूद्ध एमआयडीसी पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता कलम २१७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पोलीस दलाचे वतीने अवाहन करण्यात येते की, कोणीही डायल ११२ अथवा इतर कोणत्याही माध्यमातून खोटे कॉल करू नयेत.अन्यथा संबंधितांवर कायदेशिर कारवाई होऊन संबंधितास १ वर्षाचा कारवास किंवा दहा रूपये द्रव्यदंड अशी शिक्षा होऊ शकते.

तरी सदरची बातमी आपल्या लोकप्रिय न्युज चॅनल/दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध होणेस विनंती आहे.

( प्रमोद वाघमारे )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
एमआयडीसी पोलीस ठाणे
सोलापूर शहर

Scanned with CamScanner